# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

### परिपत्रक क्र. ७६ /२०१९

**विषय : विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना सातव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतन संरचनेतील वेतननिश्चितीबाबत...**

**संदर्भ : १. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५६/१८/विशि-१, दिनांक ०८.०३.२०१९**

**२. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. ममअ-ब/२०१९/७वे.आ./वि.अ.आ./ प्रशा-१/५८३८, दिनांक १५.०४.२०१९**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक यांना प्राप्त आदेशानुसार या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्नित **अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांना** सातवा वेतन आयोगाच्या संरचनेतील वेतननिश्चिती करण्यासाठी खालील दिलेल्या कागदपत्रे/सूचनांप्रमाणे पाच प्रतींमध्ये प्रस्ताव महाविद्यालयाच्या स्तरावर तयार करण्यात यावेत.

संबंधित महाविद्यालयांनी सदर वेतननिश्चितीचे प्रस्ताव पाच प्रतींमध्ये विद्यापीठ स्तरावरील पडताळणीकरिता आवश्यक कागदपत्रांसहित व वेळापत्रकानुसार सादर करण्यासाठी प्राचार्य व वेतननिश्चिती संदर्भातील माहिती असणारी महाविद्यालयातील तज्ज्ञ व्यक्ती यांनी महाविद्यालयांच्या स्वखर्चाने उपस्थित राहून प्रस्ताव सादर करावेत. महाविद्यालयांच्या प्राचार्य यांचा प्रस्ताव संस्था अध्यक्ष/सचिव यांच्या सही शिक्क्यानिशी सादर करावा. महाविद्यालयांनी महाविद्यालयातील अनुदानित शिक्षकांचे प्रस्ताव एकत्रित करुन पडताळणीसाठी तयार करुन ठेवावेत.

| अ. क्र. | वेतननिश्चितीकरिता आवश्यक कागदपत्रे |
|---|---|
| १. | • Appendix IV-Form of Option<br>• Undertaking<br>• Agreement<br>• Proforma for fixation of Pay<br>**(वरील सर्व कागदपत्रे लेजर लिगल पेपर वर तयार करण्यात यावी सोबत सॉफ्ट कॉपी घेऊन यावी)** |
| २. | Original Service Book (with update entries.) अद्ययावत नोदीसह सेवापुस्तक |
| ३. | दि.०१.०१.२०१६ नंतर स्थाननिश्चिती/पदोन्नती झालेली असल्यास विद्यापीठाचे स्थाननिश्चिती/वेतननिश्चितीचे पत्र, शासन आदेशाच्या छायांकित प्रती. |
| ४. | **सातव्या वेतन आयोगाची वेतननिश्चिती करणे पुर्वी त्यापूर्वी झालेल्या सर्व प्रकारच्या वेतननिश्चिती (वेतन आयोग, कॅस, पीएच.डी./एम.फील. स्टेपअप, कोर्ट केस यांची पडताळणी करून घेणे आवश्यक आहे.**<br>**दिनांक ७ मार्च, २०१९ पर्यंतचे सेवापुस्तकातील नोदीची लेखाधिकारी, उच्च शिक्षण यांनी पडताळणी केलेल्या सेवापुस्तकांचीच सातव्या वेतन आयोगा संदर्भातील वेतननिश्चिती तपासून देण्यात येईल.** |

**नगर, नाशिक व पुणे जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील अनुदानित शिक्षकांच्या सातव्या वेतन आयोगातील वेतननिश्चिती दिनांक ०८ मे २०१९ ते दिनांक १५ मे २०१९ या कालावधीमध्ये करण्यात येईल. या संदर्भातील सविस्तर वेळापत्रक स्वतंत्रपणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ )
जा. क्र. एटी/सा.वे.आ./६०८ )
दिनांक: २६/४/२०१९ )

(डॉ. प्रफुल्ल अ. पवार)
कुलसचिव

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

- मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालये.
  - सदरहू परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.
- सहायक कुलसचिव, मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय.
- सहायक कुलसचिव, मा. कुलसचिव यांचे कार्यालय.

*D:\Shekhar Office\7thPay\College Fixation Camp Circular.docx*